**CNR No.MHLA-05-000660-2018**

## नि.क.५ खालील आदेश
## (दि.२६/०९/२०१९)

सदरचा अर्ज वादींनी आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रीया संहीता अंतर्गत दाखल केलेला असुन प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्याकडे जमा असलेली मोबदल्याची रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही त्यांच्याकडुन उचलु नये म्हणुन दाव्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाई हुकूम मागीतला आहे.

२) वादी तर्फे ॲड.श्री.डी.एल.घोगरे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांचा व त्यांच्या वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.

३) वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांनी दाखल केलेले वादपत्र, लेखी कैफीयती आणि दाव्यात उपलब्ध असलेल्या दस्ताऐवजांवरून माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष मी खालील कारणास्तव देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १) वादी हे सिद्ध करू शकतात काय की, प्रथम दर्शनी हा दावा त्यांच्या बाजुने आहे? | ....नाही. |
| २) वादी हे सिद्ध करू शकतात काय की, संतुलनाच्या तुळाचे पारडे त्यांच्या बाजुने आहे? | ....नाही. |
| ३) जर मनाई हुकुमाचा आदेश प्रतिवादी क्रं.१ ते ३ विरूद्ध झाला नाही तर वादी यांचे कधीही पैशाने भरून न निघणारे नुकसान होणार ? | ....नाही. |
| ४) काय आदेश ? | ....अर्ज खारीज करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क.१ ते ३ ला अनुमोदुन**

४) वादी यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, वादी क्रं.१ ते ५ व प्रतिवादी क्रं.४ हया प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्या सख्ख्या बहिणी आहेत. वादी क्रं.६ हा वादी क्रं.१ ते ५ आणि प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांच्या बहिणीचा मुलगा आहे. वादी क्रं.१ ते ५ आणि प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांचे मयत वडील नागनाथ तुकाराम बिलापट्टे यांची जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रं.३६१ च्या रूंदीकरणाकरीता प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांनी संपादीत केलेली होती. त्यामुळे प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांना सदरच्या वादपत्रात पक्षकार म्हणुन सामील केले आहे. मयत नागनाथ तुकाराम बिलापट्टे हे सर्वे क्रं.६६/१ क्षेत्रफळ २ हे.७५ आर मौजे टेंभुर्णी येथील जमीनीचे मालक होते व आहेत. सर्वे क्रं.६६/१ क्षेत्रफळ २ हे. ७५ आर पैकी प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांनी गांजुर ते राळगा राष्ट्रीय महामार्ग क्रं.३६१ च्या रूंदीकरणाकरीता क्षेत्रफळ १ हे. ४४ आर संपादीत केली होती. प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांनी सदर भुसंपादन केलेल्या जमीनीचा मोबदला रक्कम रूपये ८,१७,७१,२२०/- निश्चित केलेली आहे.

५) पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, नागनाथ तुकाराम बिलापट्टे हे दि.१५/०८/२०१८ रोजी मरण पावले. वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ४ हे त्यांचे कायदेशीर वारस व हक्कदार आहेत. मयत नागनाथ यांनी दि.०७/०८/२०१८ रोजी वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांच्या हक्कात पंजीकृत मृत्युपत्र करून दिले होते व त्यांनी मृत्युपत्र केल्याबाबतची बाब ही वादींच्या नातेवाईकांना सांगीतली होती. त्यानंतर वादींनी दि.१०/०९/२०१८ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, अहमदपूर यांच्याकडे मृत्युपत्राची प्रत मिळण्याकरीता अर्ज सादर केला व त्यांना दि.११/०९/२०१८ रोजी सदरच्या मृत्युपत्राची प्रत मिळाली. सदरच्या मृत्युपत्रात वादी क्रं.१ हिला रूपये ७०,००,०००/- मोबदला, वादी क्रं.२ हिला रूपये ६५,००,०००/- मोबदला, वादी क्रं.३ हिला रूपये ६५,००,०००/- मोबदला, वादी क्रं.४ हिला रूपये ६५,००,०००/- मोबदला, वादी क्रं.५ हिला रूपये ६५,००,०००/- मोबदला आणि

वादी क्रं.६ याला रूपये ६५,००,०००/- मोबदला देण्याबाबतचा उल्लेख आहे. सदरची रक्कम ही वाद रक्कम आहे. सदरच्या मृत्युपत्रान्वये प्रतिवादी क्रं.४ हिला ६५,००,०००/- आणि उर्वरित मोबदल्याची रक्कम ही प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्यात समप्रमाणात वाटुन देण्यात यावी असे नमुद आहे. सदरच्या मृत्युपत्रातील संपुर्ण मोबदल्याची रक्कम ही प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्या कार्यालयातुन उचलतील व त्यानंतर ते वादींना त्यांच्या हिश्शातील मोबदला देतील असे नमुद आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे संपुर्ण मोबदल्याची रक्कम उचलुन त्यांच्यात समप्रमाणात परस्पर वाटुन घेण्याच्या तयारीत आहेत. तसेच, प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे वादी व प्रतिवादी क्रं.४ यांना त्यांच्या हिश्शाच्या मोबदल्याची रक्कम ही संपुर्ण मोबदल्याची रक्कम रूपये ८,१७,७१,२२०/- यामधुन देण्यास तयार नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्याकडुन संपुर्ण मोबदल्याची रक्कम उचलण्यापासुन मनाई करण्यात यावी याकरीता सदरचा अर्ज सादर केला आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, वादींच्या बाजूने प्रथम दर्शनी केस उत्तम व कायद्याचे पारडे सुध्दा त्यांच्या बाजुने आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी मोबदल्याची रक्कम प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्याकडुन उचलल्यास वादींचे कधीही न भरून निघणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

६) प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांनी नि.क्रं.२९ अन्वये त्यांचा लेखी जबाब सादर केला आहे व त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, वादींनी सादर केलेला दावा हा खोटा आहे. पुढे त्यांनी त्यांच्या लेखी जबाबात असे कथन केले की, वादींना प्रतिवादींविरूध्द दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडले नसुन वादींचा दावा अपरिपक्व असुन तो खारीज होण्यास पात्र आहे.

७) प्रतिवादी क्रं.५ यांच्यातर्फे ॲड.श्री.मुंढे यांनी असा युक्तिवादात केला की, प्रतिवादी क्रं.७ ने संपादीत केलेल्या जमीनीचा जो मोबदला निश्चित केला होता तो मोबदला प्रतिवादी क्रं.५ ने प्रतिवादी क्रं.७ च्या कार्यालयात जमा केलेला आहे. सदरचा मोबदला हा वितरीत करण्याचे

अधिकार प्रतिवादी क्रं.७ ला आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, प्रतिवादी क्रं.५ चा या दाव्याशी कोणताही संबंध नसल्यामुळे त्यांच्या विरूध्द कोणताही तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात येउ नये.

८) प्रतिवादी क्रं.६ व ७ यांनी नि.क्रं.२४ अन्वये त्यांचा लेखी जबाब सादर केला आहे व त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदरील भुसंपादनाचे प्रकरण सुरू असुन आवार्डच्या स्थितीपर्यंत आलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांचे नाव बेकायदेशीरपणे लागलेले आहे असे म्हणता येणार नाही. संपादनाच्या क्षेत्राबद्दल न्यायालयात वाद प्रलंबीत असल्यास व संपादीत क्षेत्राची मालकी सिध्द होत नाही तो पर्यंत संपादीत क्षेत्राचा मावेजा प्रतिवादी क्रं.६ व ७ चे कार्यालय कोणासही देणार नाही. तसेच, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वादग्रस्त संपादीत क्षेत्राचा मावेजा न्यायालयाने ठरविलेल्या मालकासच देण्यात येईल. पुढे त्यांनी त्यांच्या लेखी जबाबात अशी विनंती केली आहे की, दावा खर्चासह खारीज करण्यात यावा.

९) वादींच्या म्हणण्याप्रमाणे शेत सर्वे क्रं.६६/१ क्षेत्र १ हे. ४४ आर या जमीनीचे ते संयुक्त मालक असल्यामुळे त्याच्या संपादनामुळे जो मोबदला आलेला आहे त्यात त्यांचा हिस्सा आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे वडील मयत नागनाथ यांनी दि.०७/०८/२०१८ रोजी मृत्युपत्र करून ठेवले होते. त्या मृत्युपत्राच्या अनुशंगाने वादी क्रं.१ हिला ७०,००,०००/- व वादी क्रं.२ ते ६ व प्रतिवादी क्रं.४ यांना प्रत्येकी ६५,००,०००/- रूपये मोबदल्याची रक्कम देण्याबाबत नमुद आहे. तसेच, उरलेल्या रकमेमध्ये प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना समप्रमाणात हिस्सा राहील असे सुध्दा नमुद आहे. वादींनी नि.क्रं.४ अन्वये सादर केलेल्या यादीसह अनु.क्रं.२ प्रमाणे दाखल केलेल्या मृत्युपत्राचे अवलोकन केले असता त्यात असा मजकुर नमुद आहे की, ''सर्वे क्रं.६६/१ मधील क्षेत्र १ हे. ४४ आर राष्ट्रीय महामार्ग यामध्ये संपादीत होत आहे व येणारा मावेजा रामचंद्र, हरिश्चंद्र व भगवान यांनी उचलुन घ्यावा व येणा-या मावेजातुन माझ्या पाच मुली व एक नातु आकाश रेड्डी यांना प्रत्येकी मावेजा मिळाल्यानंतर ६५,००,०००/- रूपये द्यावे

तसेच, विजया गुंडरे या मुलीस माझ्या मुलींना मावेजा आल्यानंतर ७०,००,०००/- रूपये द्यावेत व शिल्लक राहिलेली रक्कम माझ्या तीन मुलांनी समान वाटुन घ्यावी.'' वादींनी प्रतिवादी क्रं.७ ने सर्वे क्रं.६६/१ चा निवाडा पारीत केल्या बाबतचा कोणताही दस्ताऐवज सादर केला नाही. तसेच, सदर जमीनीचा किती मोबदला निश्चित करण्यात आला आहे त्याबाबतचे सुध्दा कोणतेही दस्ताऐवज सादर केले नाही. तसेच, वादींनी प्रतिवादी क्रं.७ च्या कार्यालयात रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही रक्कम प्रलंबित आहे हे दाखविण्याकरीता कोणतेही दस्ताऐवज सादर केले नाही. तसेच, वादींनी सदरच्या रकमेबाबत सक्षम अधिका-यांकडे त्यांच्या मालकी संबंधी आक्षेप नोंदविला आहे व त्याबाबतचे प्रकरण प्रलंबित आहे याबाबत सुध्दा दस्ताऐवज सादर केलेले नाहीत. तसेच, प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्रं.७ च्या कार्यालयात रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही उचलण्याकरीता कार्यवाही केली आहे, हे दाखविण्याकरीता सुध्दा त्यांनी कोणतेही दस्ताऐवज सादर केले नाहीत.

१०) प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांनी सदरची जमीन ही संपादीत केल्याबाबत मान्य केले आहे. प्रतिवादी क्रं.५ यांनी त्यांच्या लेखी जबाबात त्यांनी संपादीत केलेल्या जमीनीची रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही मोबदला म्हणुन जमा केली आहे याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच, प्रतिवादी क्रं.६ व ७ यांनी त्यांच्या लेखी जबाबात प्रतिवादी क्रं.५ कडुन त्यांना रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही प्राप्त झाल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या लेखी जबाबात सदरच्या संपादीत केलेल्या जमीनीचे प्रकरण हे अद्याप निवाडयाच्या स्थितीपर्यंत आलेले नाही असे कथन केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या लेखी जबाबात केलेल्या कथनावरून असे दिसुन येते की, त्यांनी सदरची जमीन संपादित केल्याबद्दल निवाडयाची कार्यवाही अद्याप सुरू केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे मोबदल्याची रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही उचलण्याच्या तयारीत आहे व

तसे केल्यास वादी हे त्यांच्या हक्कापासुन वंचित होत आहेत ही बाब सद्य स्थितीत दिसुन येत नाही.

११) वरील सर्व चर्चेवरुन ही बाब सिध्द होत नाही की, प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला रक्कम रूपये ३,९५,००,०००/- (रूपये तीन कोटी पंच्चान्नव लाख) ही प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्या कार्यालयातुन उचलण्याच्या तयारीत आहेत. तसेच, प्रथम दर्शनी हा दावा वादींच्या बाजुने दिसून येत नाही. तसेच, न्यायदानाचे पारडे वादींच्या बाजुस नाही. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ३ ला नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ ला अनुमोदुन</u>**

१२) वरील मुद्दा क्र.१ ते ३ च्या निष्कर्षाला अनुसरून मी मुद्दा क्रं.४ वर खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खारीज करण्यात येतो.

२) खर्चाबद्दल कोणताही आदेश नाही.

अहमदपूर.
दिनांक : २६/०९/२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : A.S.Kodgire |
| Dictated on | : 26.09.2019 |
| Checked on | : 26.09.2019 |
| Signed on | : 26.09.2019 |
| Uploaded on | : 27.09.2019 |